मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी–चिंचवड | शनिवार, दि. 20 जून 2026 | पान- 1

# फुगेवाडी दारूकांडातील 19 बळींच्या चौकशीसाठी आमदार शंकर जगताप यांची 'लक्षवेधी' !

## हिंजवडी वाहतूक कोंडी, आयटीयन्ससाठी फास्टट्रॅक लेबर कोर्ट आणि कंपन्यांचे 'सेफ्टी ऑडिट' सह विविध प्रश्नांवरून सरकारचे वेधणार लक्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

फुगेवाडी, दापोडी आणि हडपसर येथे बनावट व विषारी हातभट्टी दारू सेवनामुळे तब्बल १९ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याची अत्यंत गंभीर घटना घडली होती . या भीषण दुर्घटनेचे पडसाद विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनात उमटणार आहेत. चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार शंकर जगताप यांनी या संवेदनशील प्रकरणावर लक्षवेधी सूचना (लक्षवेधी क्रमांक १) विधानसभेत दाखल केली आहे.

राज्याचे पावसाळी अधिवेशन येत्या २२ जूनपासून मुंबई येथे सुरु होत आहे. या अधिवेशनात लक्षवेधीच्या माध्यमातून फुगेवाडी विषारी दारूकांडाकडे सरकारचे लक्ष वेधून घेत, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची आणि या जीवघेण्या अवैध धंद्यांची पाळेमुळे उखडून टाकण्याची आक्रमक मागणी आमदार जगताप करणार आहेत. गेल्या २८ मे ते १ जून २०२६ या कालावधीत फुगेवाडी, दापोडी आणि हडपसर परिसरात विषारी गावठी दारू पिऊन १९ जणांचा वेदनादायी अंत झाला होता. काळा गूळ आणि उसाच्या मळीपासून तयार केल्या जाणाऱ्या गावठी दारूची नशा व तीव्रता वाढवण्यासाठी माफियांकडून धोकादायक नवसागर, युरिया, ऑक्सिटोसिन रसायन, आणि अत्यंत प्राणघातक मिथेनॉल यांसारख्या रसायनांची बेकायदेशीरपणे भेसळ करून हे मृत्यूचे तांडव घडवून आणले गेले.



### या प्रश्नांवर आवाज उठविणार!

» हिंजवडी आयटी पार्कमधील वाहतूक कोंडी सोडवणे. आयटी कर्मचाऱ्यांच्या नोकरीविषयक तक्रारींसाठी 'फास्टट्रॅक लेबर कोर्ट' सुरू करणे या मागणीसह औद्योगिक क्षेत्रातील दुर्घटना रोखण्यासाठी सर्व कंपन्यांचे 'सेफ्टी ऑडिट' बंधनकारक करणे. शहरातील बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने सुरू करावे. पिंपरी-चिंचवड मनपाचा चुकांनी भरलेला प्रारूप विकास आराखडा रद्द करावा आणि मनपा प्रशासनातील ४,७७६ रिक्त जागा तातडीने भरण्यासाठी मंजुरी द्यावी. याशिवाय, प्राधिकरणाच्या आरक्षित जागांवर दीर्घकाळापासून राहणाऱ्या नागरिकांना त्यांच्या मालकीचे सातबारा आणि प्रॉपर्टी कार्ड मिळावे. 'महाज्योती' संस्थेमार्फत वंचित विद्यार्थ्यांची तांत्रिक कारणांमुळे अडकलेली सुमारे १२६ कोटी रुपयांची थकीत शिष्यवृत्ती तातडीने मंजूर करावी, औंध जिल्हा रुग्णालयातील बंद असलेली एमआरआय सुविधा सुरू करावी आणि महापालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये रुग्णांसाठी 'कॅशलेस' सुविधा उपलब्ध करून द्यावी, या मागण्यांवर आमदार जगताप सभागृहात आवाज उठवणार आहेत.

> आगामी काळात "अवैध दारूचा साठा, वाहतूक आणि विक्रीची संपूर्ण साखळी उद्ध्वस्त करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग, पिंपरी-चिंचवड पोलीस आणि पुणे ग्रामीण पोलीस यांच्यात तातडीने माहितीची देवाणघेवाण करून संयुक्त कारवाई होणे गरजेचे आहे. यासाठी विशेष पथकाची सक्षम यंत्रणा उभारून मृतांच्या कुटुंबीयांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत व पुनर्वसन दिले पाहिजे. ही मागणी लक्षवेधीद्वारे सभागृहासमोर ठेवली आहे.
>
> - शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा

याबाबत आमदार शंकर जगताप म्हणाले , दारूकांड झाल्यानंतरही तसेच शहरात पोलिसांची कारवाई सुरू असताना दारू माफियांनी दुर्गम भागात आपल्या हातभट्ट्या हलवून शहरात विषारी दारू पुरवठा सुरूच ठेवल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामुळे पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दारू माफियांनी फुगेवाडी, दापोडी आणि हडपसरमध्ये मृत्यूचे जे तांडव घडवले, ते पाहून मन सुन्न झाले आहे. रसायनांची जीवघेणी भेसळ करून निष्पाप नागरिकांचे बळी घेणाऱ्या या गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्यांचीही गय केली जाणार नाही. या पीडित कुटुंबांचे अश्रू वाया जाऊ देणार नाही. अधिवेशनात या गंभीर विषयावर पहिली 'लक्षवेधी' मांडून गुन्हेगारांना शिक्षा आणि पीडितांचे पुनर्वसन हीच माझी प्राथमिकता आहे." असे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.

# सध्या पवना धरणामध्ये केवळ 19 टक्के इतकाच उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध

## पाणीपुरवठ्यात 15 टक्के कपात करण्याच्या पाटबंधारे विभागाकडून पिंपरी चिंचवड महापालिकेला सूचना; कपात आजपासून सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

पवना धरणातील उपयुक्त पाणीसाठा १९ टक्के शिल्लक राहिल्याने आणि यंदाच्या मान्सूनला झालेल्या विलंबामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्यात १५ टक्के कपात करण्याच्या सूचना पुणे पाटबंधारे विभागाने पिंपरी चिंचवड महापालिकेला दिल्या आहेत. त्याअनुषंगाने शहराच्या पाणी पुरवठ्यात आज शुक्रवार, १९ जून २०२६ पासून १५ टक्के कपात करण्यात येत असून नागरिकांनी पाण्याचा वापर जपून व काटकसरीने करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.



पिंपरी चिंचवड शहराला पवना धरणातून पाणीपुरवठा केला जातो. सध्या धरणामध्ये केवळ १९ टक्के इतकाच उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून, मान्सूनच्या आगमनास झालेल्या विलंबामुळे आगामी कालावधीतील पाण्याची उपलब्धता आणि वाढती मागणी लक्षात घेता उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर आणि नियोजनबद्ध व्यवस्थापन करणे आवश्यक झाले आहे. या पार्श्वभूमीवर पुणे पाटबंधारे विभागाने महापालिकेला पाणीपुरवठ्यात १५ टक्के कपात करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार शहरातील पाणीपुरवठ्यात आवश्यक ती कपात करण्यात आली असल्याचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सांगितले आहे.

> उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्यासाठी पाणीपुरवठ्यात १५ टक्के कपात करण्यात आली आहे. नागरिकांनी पाण्याचा वापर अत्यंत जपून करावा. वाहन धुणे, बागांना अतिरिक्त पाणी देणे, नळ विनाकारण सुरू ठेवणे यांसारख्या बाबी टाळून पाणी बचतीत सक्रिय सहभाग नोंदवावा. पाण्याची बचत ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असून, पाणी बचतीचे नियम पाळून महापालिकेला सहकार्य करावे.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पवना बंद जलवाहिनी प्रकल्पाला गती!

## 750 MLD क्षमतेमुळे पिंपरी-चिंचवडचा पाणीप्रश्न सुटणार!, भाजपा आमदार महेश लांडगे यांची महत्वपूर्ण बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचा भविष्यातील पाणीपुरवठा सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या पवना धरण ते निगडी बंद जलवाहिनी प्रकल्पाला गती देण्यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली शहराच्या शाश्वत विकासाच्या दृष्टीने स्थानिक शेतकरी, भूमिपुत्र आणि लोकप्रतिनिधी यांना विश्वासात घेऊन हा प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.



या बैठकीला महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपसंचालक किशोर गोखले, मुख्य अभियंता प्रमोद ओव्हाळ, सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, उषा विश्वासराव, हर्षद घुले यांच्यासह संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जलवाहिनीच्या मार्गातील तांत्रिक अडचणी तातडीने दूर करून उर्वरित भूसंपादन प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. विविध विभागांनी परस्पर समन्वय ठेवून प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर आणि निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावे, असे स्पष्ट करण्यात आले. पाणी हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित अत्यंत संवेदनशील विषय असल्याने कोणत्याही प्रकारचा प्रशासकीय विलंब सहन केला जाणार नसल्याचेही बैठकीत अधोरेखित करण्यात आले.

पवना धरणातून निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत थेट बंद जलवाहिनीद्वारे पाणी आणण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, वर्ष २०५५ पर्यंतच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करून ७५० दशलक्ष लिटर प्रतिदिन (MLD) क्षमतेचा सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पाला आयआयटी मुंबईकडून तांत्रिक मान्यता मिळाली असून त्याची एकूण अंदाजित किंमत सुमारे ८९४.६७ कोटी रुपये आहे.

या प्रकल्पांतर्गत धरण परिसरात आधुनिक हेडवर्क्स, जॅकवेल, उच्च क्षमतेचे पंप, दुहेरी गुरुत्वाकर्षण जलवाहिनी, रेल्वे मार्ग व मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाखाली टनेल बोरिंग तंत्रज्ञानाचा वापर तसेच संपूर्ण यंत्रणेवर देखरेख ठेवण्यासाठी अत्याधुनिक SCADA प्रणाली उभारण्यात येणार आहे.

प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या ३४.८५ किलोमीटर मार्गापैकी ३१.४२ किलोमीटरचे भूसंपादन पूर्ण झाले असून केवळ ३.४३ किलोमीटर क्षेत्रातील संपादन प्रक्रिया सुरू आहे. उर्वरित जमीन तातडीने संपादित करून प्रत्यक्ष कामाला अधिक वेग देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

> **पिंपरी-चिंचवडकरांच्या हक्काच्या पाण्यासाठी भाजपा महायुती सरकार कटिबद्ध आहे. सरकारने पवना बंद जलवाहिनी प्रकल्पावरील 'जैसे थे' आदेश रद्द करून अनेक वर्षांपासून रखडलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावरील स्थगिती उठवली. शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, भविष्यातील पाण्याची वाढती गरज आणि शाश्वत विकास लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात हा प्रकल्प आता सर्वोच्च प्राधान्याने पूर्ण करण्याचा आमचा संकल्प आहे. प्रकल्पातील उर्वरित भूसंपादन, तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय प्रक्रिया वेळेत पूर्ण करून नागरिकांना शुद्ध, सुरक्षित आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून पिंपरी-चिंचवडचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावणे हेच आमचे ध्येय आहे.**
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड, पुणे.**

# 'ओल्या कचऱ्याची जबरदस्ती चालणार नाही' ; आयुक्तांच्या दालनात कचरा टाकण्याचा फेडरेशनचा इशारा

## सोसायट्यांवर अन्यायकारक निर्णय लादू नका ; बिल्डरांवर कारवाई करा, अन्यथा तीव्र आंदोलन – संजीवन सांगळे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन नियम, 2026 च्या आधारे १०० किंवा त्यापेक्षा अधिक सदनिका असलेल्या गृहनिर्माण संस्थांनी स्वतःच्या आवारात ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याबाबत काढलेल्या परिपत्रकाला चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनने तीव्र विरोध दर्शविला आहे. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेत आयोजित बैठकीत फेडरेशनने हा निर्णय अन्यायकारक, अव्यवहार्य आणि सोसायट्यांवर लादलेला असल्याचे ठामपणे मांडत प्रशासनाला धारेवर धरले.



महानगरपालिकेच्या मुख्यालयात झालेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त श्री. जंगम, उपायुक्त (आरोग्य) श्री. ठेंगल, शहर अभियंता श्री.बागवानी यांच्यासह चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन, पुणे जिल्हा फेडरेशनचे पदाधिकारी तसेच विविध सोसायट्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत फेडरेशनने स्पष्ट भूमिका घेताना सांगितले की, घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ पासून अस्तित्वात असतानाही १०० पेक्षा अधिक सदनिका असलेल्या प्रकल्पांमध्ये ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची यंत्रणा उभारणे ही बांधकाम व्यावसायिकांची जबाबदारी होती.मात्र ती व्यवस्था नसतानाही संबंधित प्रकल्पांना पूर्णत्व प्रमाणपत्रे कशी देण्यात आली, असा सवाल उपस्थित करण्यात आला. संबंधित बिल्डरांवर कारवाई करून त्यांच्याकडून आवश्यक सुविधा उभारून घेतल्यानंतरच सोसायट्यांवर कोणतीही जबाबदारी टाकावी, अशी मागणी फेडरेशनने केली.

याशिवाय बहुतांश सोसायट्यांमध्ये जागेचा अभाव, मोठा आर्थिक भार, दुर्गंधी व स्वच्छतेच्या समस्या तसेच प्रक्रिया झालेल्या खताची विल्हेवाट लावण्याबाबत कोणतीही स्पष्ट यंत्रणा नसल्याचेही बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले. त्यामुळे या प्रकल्पासाठी करसवलत किंवा आर्थिक अनुदान देण्याची मागणीही करण्यात आली.

बैठकीत अनेक सोसायटी प्रतिनिधींनी इंदूर शहराच्या धर्तीवर ओल्या कचऱ्याचे संकलन व प्रक्रिया ही जबाबदारी महानगरपालिकेनेच पार पाडावी,अशी भूमिका मांडली. त्यावर अतिरिक्त आयुक्तांनी सर्व बाबींचा सखोल विचार करून तज्ज्ञांच्या उपस्थितीत कार्यशाळा आयोजित करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

> **"आजच्या बैठकीत आम्ही सोसायट्यांना ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करताना येणाऱ्या सर्व अडचणी, बिल्डरांकडून झालेल्या त्रुटी आणि आर्थिक भार याविषयी प्रशासनासमोर ठाम भूमिका मांडली. या सर्व समस्या निकाली निघेपर्यंत महापालिकेने कोणतीही सक्ती करू नये. अन्यथा फेडरेशन त्याला तीव्र विरोध करेल. आणि जर तोडगा न काढता महापालिकेने ओला कचरा उचलणे बंद केले, तर तोच ओला कचरा आयुक्तांच्या दालनात टाकून तीव्र आंदोलन करण्यात येईल.**
>
> **- संजीवन सांगळे अध्यक्ष, चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन**

# पीएम श्री माध्यमिक विद्यालय, थेरगाव येथील भाऊ-बहिणीची क्रिकेट क्षेत्रात भरारी

## योगेश यादवची मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अंडर-16 नवी मुंबई संघात तर आकाशवाणी यादवची अंडर-14 हिंगोली जिल्हा क्रिकेट संघात निवड

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पीएम श्री माध्यमिक विद्यालय, थेरगाव येथील दोन विद्यार्थ्यांनी क्रिकेट क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत शाळेसह शहराचे नाव उज्ज्वल केले आहे. विद्यालयातील इयत्ता दहावीचा विद्यार्थी योगेश विलास यादव याची मुंबई क्रिकेट असोसिएशन (MCA) अंतर्गत अंडर-१६ नवी मुंबई जिल्हा संघात निवड झाली आहे. तसेच त्याची बहीण आणि विद्यालयातील विद्यार्थिनी आकाशवाणी यादव हिची महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या अंडर-१४ हिंगोली जिल्हा क्रिकेट संघात ऑलराऊंडर म्हणून निवड झाली आहे.





आकाशवाणी यादव हिची इयत्ता सहावीत असतानाच जिल्हास्तरीय क्रिकेट संघासाठी निवड झाली होती. सातत्यपूर्ण सराव आणि उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तिने पुन्हा एकदा जिल्हा संघात स्थान मिळवले आहे. दुसरीकडे, योगेश यादव याने गोलंदाज म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, त्याने आतापर्यंत सुमारे ६० सामने खेळताना तब्बल १०९ बळी घेतले आहेत. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत त्याची अंडर-१६ नवी मुंबई संघात निवड करण्यात आली आहे.

या दोन्ही विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे तसेच प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी त्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या यशामागील प्रेरणेबद्दल बोलताना सांगितले की, विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबासाहेब राठोड यांनी त्यांना क्रिकेट सरावासाठी वेळोवेळी सहकार्य केले. स्पर्धांसाठी जाणे, सरावाचे नियोजन तसेच विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी सातत्याने मार्गदर्शन केले. शिक्षक आणि शाळेच्या पाठबळामुळेच हे यश मिळवणे शक्य झाले, अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. अत्यंत प्रतिकूल आणि हलाखीच्या आर्थिक परिस्थितीतून या भाऊ-बहिणीने जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर यशाचे शिखर गाठले आहे. त्यांचे वडील सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत असून आई गृहिणी आहे. शालेय शिक्षण सांभाळत दोघेही दररोज शाळेनंतर सुमारे चार तास क्रिकेटचा सराव करतात. कठोर मेहनत आणि खेळावरील निष्ठेच्या जोरावर त्यांनी ही यशस्वी वाटचाल घडवून आणली आहे. योगेश आणि आकाशवाणी हे दोघेही माजी भारतीय क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांच्या क्रिकेट अकादमीत प्रशिक्षण घेत आहेत. आपल्या यशामध्ये दिलीप वेंगसरकर तसेच अकादमीतील प्रशिक्षकांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले. योग्य मार्गदर्शन, नियमित सराव आणि कुटुंबीयांच्या पाठिंब्यामुळेच हे यश मिळवता आले, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

> **योगेश यादव आणि आकाशवाणी यादव यांनी क्रिकेट क्षेत्रात मिळवलेले यश हे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या क्षमता, जिद्द आणि चिकाटीचे प्रतीक आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी जिल्हास्तरीय संघात स्थान मिळवले, ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. त्यांच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल. त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.**
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

> **महापालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रालाही विशेष प्रोत्साहन दिले जात आहे. योगेश आणि आकाशवाणी यांनी अंडर-१६ आणि अंडर-१४ स्तरावर मिळवलेले यश हे त्यांच्या कठोर परिश्रमाचे तसेच शिक्षक, पालक आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फलित आहे. भविष्यात ते राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरही उल्लेखनीय कामगिरी करतील, असा विश्वास आहे.**
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

> **महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर क्रीडा क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण करत आहेत. योगेश आणि आकाशवाणी यांची निवड ही त्यांच्या सातत्यपूर्ण सराव, शिस्त आणि समर्पणाची पावती आहे. सामान्य कुटुंबातून येऊन त्यांनी मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा..**
> **- ममता शिंदे, उपायुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

# हजेरी असेल तरच कंत्राटदारांना मिळणार बिले

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी 'बायोमेट्रिक' अनिवार्य : - स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत आता कडक धोरण अवलंबले जाणार असून, ठेकेदारांमार्फत सेवा देणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी 'थंब रीडिंग' (बायोमेट्रिक हजेरी) अनिवार्य करण्यात येणार आहे. यापुढे ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक हजेरी नोंदवली जाईल, त्यांच्याच कामाची बिले कंत्राटदारांना अदा केली जातील, असा निर्णय स्थायी समितीने घेतला आहे, अशी माहिती स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी दिली.



महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत सदस्यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत आणि कंत्राटदारांच्या देयकांबाबत गंभीर मुद्दे उपस्थित केले होते. महापालिकेच्या उद्यान विभाग, आरोग्य विभाग, वैद्यकीय विभाग, सुरक्षा विभाग आणि विविध तांत्रिक सल्लागार विभागांमध्ये मोठ्या संख्येने कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र, अनेकदा प्रत्यक्ष कामगार कामावर हजर नसतानाही त्यांची कागदोपत्री हजेरी लावून बिले उचलली जात असल्याच्या तक्रारी सदस्यांनी बैठकीत केल्या होत्या. सदस्यांच्या या रास्त मागणीची दखल घेत सभापती अभिषेक बारणे यांनी आता बायोमेट्रिक हजेरीशिवाय बिले मंजूर न करण्याचे कठोर निर्देश दिले आहेत.

या निर्णयाबाबत बोलताना स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे म्हणाले की,"महापालिकेच्या कामात पारदर्शकता आणणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. महापालिकेच्या तिजोरीतून होणारा खर्च हा करदात्यांचा आहे, त्यामुळे त्यात कोणताही गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही. मग तो उद्यान विभाग असो, आरोग्य, वैद्यकीय, सुरक्षा विभाग असो किंवा सल्लागार कर्मचारी असोत, सर्वच कंत्राटी कर्मचाऱ्यांची उपस्थिती आता बायोमेट्रिक प्रणालीद्वारेच मोजली जाईल. केवळ बायोमेट्रिक नोंद असलेल्या कामाचेच मोजमाप केले जाईल आणि त्यानुसारच कंत्राटदारांची बिले अदा केली जातील. या निर्णयामुळे कामाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती निश्चित होईल आणि बोगस हजेरीला पूर्णपणे आळा बसेल." या निर्णयामुळे महापालिकेच्या दैनंदिन कामकाजात शिस्त येणार असून, कंत्राटदारांनी आपल्या सर्व कर्मचाऱ्यांची नोंदणी बायोमेट्रिक प्रणालीमध्ये त्वरित पूर्ण करावी, असे आदेशही प्रशासनाला देण्यात आले आहेत.

# दिवसाआड पाणीपुरवठ्याचे नियोजन कोलमडले;तीन दिवसांत 593 तक्रारी

## कमी दाब, गढूळ पाणी आणि कोरडे नळ यामुळे नागरिक त्रस्त; टँकरच्या फेऱ्या 1,500 पर्यंत वाढल्या

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात सोमवारपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर अवघ्या तीन दिवसांतच महापालिकेच्या नियोजनातील त्रुटी समोर आल्यात. कमी दाबाने पाणी येणे, नियोजित वेळेपेक्षा उशिरा पुरवठा होणे, अनेक भागांत नळ कोरडे राहणे, तसेच गढूळ पाणी येणे, अशा समस्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

आतापर्यंत महापालिकेकडे ५९३ तक्रारी दाखल झाल्या असून, त्यापैकी केवळ २३७ तक्रारींचे निराकरण झाले आहे. उर्वरित तक्रारींवर काम सुरू असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे उपायुक्त नंदकुमार जगताप यांनी दिली.

एक दिवसाआड पाणीपुरवठा लागू करण्यापूर्वी पुरेसे नियोजन झाले होते का? असा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे. अनेक भागांत अवघे १५ ते ३० मिनिटेच पाणी येत असून, त्याचाही दाब अत्यंत कमी आहे. काही भागांत गढूळ पाणीपुरवठ्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. परिणामी अनेक कुटुंबांना टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. वाढत्या मागणीमुळे महापालिकेच्या टँकर फेऱ्या १,४०० वरून १,५०० पर्यंत वाढवाव्या लागल्या आहेत.

शहराच्या पूर्व भागात परिस्थिती अधिक गंभीर आहे. हांडेवाडी, औताडेवाडी, होळकरवाडी आणि महंमदवाडीतील काही भागांत चार ते सहा दिवसांनी पाणी मिळत असल्याची तक्रार आहे. मांजरी परिसरातील बोअरवेल आणि विहिरी कोरड्या पडल्या असून नळाद्वारे होणारा पुरवठाही अत्यल्प आहे.

खराडीत सुरुवातीला पिवळे व गढूळ पाणी येत असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात पाणी वाया घालवावे लागत आहे. शिवसृष्टी-आंबेगाव बुद्रुक परिसरात वर्षभरापासून एक दिवसाआड आणि कमी दाबानेच पाणी मिळत असल्याची नागरिकांची व्यथा आहे. शुक्रवार पेठ, महात्मा सोसायटी (कोथरूड) यासह अनेक भागांतही कमी दाबामुळे पाण्याच्या टाक्या भरत नसल्याची तक्रार आहे.

कोथरूड, बाणेर आणि बालेवाडीतील तक्रारी सोडविल्याचा दावा प्रशासनाने केला असला, तरी हडपसर, काळेपडळ, शांतीनगर, महंमदवाडी, सय्यदनगर, केशवनगर आणि खराडीतील अनेक भागांमध्ये पाणीटंचाई कायम आहे.

दत्तवाडी परिसरात अशुद्ध व कमी दाबाच्या पाणीपुरवठ्याच्या तक्रारी वाढल्यानंतर महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी स्वतः पाहणी करून अधिकाऱ्यांना कायमस्वरूपी उपाययोजना तयार करण्याचे निर्देश दिले. मात्र, अशा योजना संकट निर्माण झाल्यानंतरच का आखल्या जातात, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.



### पूर्व भागातील गंभीर स्थिती

**» हांडेवाडी, औताडेवाडी, होळकरवाडी, महंमदवाडी आणि मांजरी परिसरात पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र झाले आहे. काही भागांत चार ते सहा दिवसांनी पाणी मिळत असल्याच्या तक्रारी आहेत. बोअरवेल आणि विहिरी कोरड्या पडल्याने नागरिक पूर्णपणे महापालिकेच्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून आहेत. मात्र, कमी दाबामुळे पुरवठाही अपुरा ठरत आहे. त्यामुळे नागरिकांना खासगी टँकरचा आधार घ्यावा लागत असून आर्थिक भार वाढत आहे.**

### टँकरचे शुल्क कमी करा

**» वडगाव खुर्द येथील टँकर पॉइंटवरून खासगी टँकरधारकांनाही पाणी भरण्याची परवानगी द्यावी. तसेच महापालिकेकडून आकारले जाणारे ६५० रुपयांचे शुल्क ५० टक्क्यांनी कमी केल्यास नागरिकांना कमी दरात पाणी उपलब्ध होईल आणि पाणीटंचाईचा प्रश्न काही प्रमाणात कमी होईल, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे गटनेते सोपान ऊर्फ काका चव्हाण आणि नगरसेवक सुभाष नानेकर यांनी केली.**

### वेळ बदलल्याने नागरिकांची गैरसोय

**» प्रभाग क्रमांक १२ मध्ये पाणीपुरवठ्याची वेळ सकाळी १० ते दुपारी ३ अशी केल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. दिवसभराच्या वेळेमुळे अनेकांना पाणी साठविणे शक्य होत नाही. त्यातच कमी दाबामुळे पुरेसे पाणी मिळत नसल्याने पाणीपुरवठ्याची वेळ पूर्ववत किंवा नागरिकांना सोयीची करण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका पूजा जागडे यांनी केली.**

# स्मार्ट मीटर सक्तीवर प्रश्नचिन्ह; वीजग्राहकांमध्ये संभ्रम, महावितरणकडून आरोपांचे खंडन

## स्मार्ट मीटरमुळे वीज बिल वाढल्याच्या तक्रारी; पुणे परिमंडलात 14.72 लाख ग्राहकांकडे बसविले मीटर

**पुणे | प्रतिनिधी**

स्मार्ट मीटर कायद्याने बंधनकारक आहे का? याचे स्पष्ट उत्तर महावितरणकडे नाही. वीज मीटर चालू असताना ते बदलण्याचं कारण काय? महावितरणचं कोणतंही अधिकृत स्पष्ट पत्र ग्राहकांच्या हाती का दिले जात नाही? अशा अनेक प्रश्नांमुळे पुणे आणि परिसरातील वीजग्राहकांमध्ये सध्या संभ्रमाचे वातावरण आहे. महावितरणकडून सुरू असलेल्या स्मार्ट मीटर बदलण्याच्या मोहिमेमुळे सर्वसामान्य ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागत असून, यात नेमका कोणाचा फायदा होणार आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया वीज ग्राहकांतून उमटत आहे.

नवीन सिटी (स्मार्ट) मीटरचा मोठा फटका पुणे परिसरातील छोटे उद्योजक, व्यावसायिक आस्थापना आणि सौर ऊर्जा वापरणाऱ्यांना बसत आहे. स्मार्ट मीटरमुळे वीज बिल वाढल्याच्या तक्रारी येत असून, लघुउद्योगांसह सर्वसामान्य ग्राहकांचे आर्थिक नियोजन कोलमडत आहे. ग्राहकांना थेट मीटर बदलण्याची सक्ती केली जात आहे. चांगल्या स्थितीत असलेले मीटर काढून कोट्यवधी रुपयांचा खर्च ग्राहकांच्या माथी मारण्याचा हा घाट असल्याचा आरोप ग्राहक संघटनांनी केला आहे. सक्ती नसली तरी सरसकट सर्वच ठिकाणी स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम वेगाने सुरू असल्याने, हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. पुणे परिमंडलात वीज ग्राहकांची संख्या सुमारे ३९ लाख असून, त्यापैकी आतापर्यंत १४ लाख ७२ हजार वीजग्राहकांनी स्मार्ट मीटर बसविले आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने मीटर बसवूनही कुठेही तक्रारी नाहीत, त्यामुळे विनाकारण गैरसमज करून घेऊ नये, असे महावितरणने म्हटले आहे.



### स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती नाही

**» महावितरणकडून स्मार्ट मीटर बसविण्याची कोणतीही सक्ती केली जात नाही. आम्ही ग्राहकांना केवळ आवाहन करत आहोत. केवळ बिलिंगच नव्हे, तर तासाला किती वीज वापरली, याचीही अचूक माहिती ग्राहकांना मिळणार आहे. दिवसा वीज वापरल्यास ग्राहकांना सवलतही मिळेल. ही सुविधा पूर्वीप्रमाणेच पोस्ट-प्रिपेड असणार आहे. त्यामुळे ग्राहकांनी या आधुनिक सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे मुख्य जनसंपर्क अधिकारी भारत पवार यांनी केले.**